.

# बातमीपत्र

## पोलीस आयुक्तालय,सोलापूर शहर

### माहिती कक्ष, दिनांक १० फेब्रुवारी २०१९

### जोडभावी पेठ पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| गुरनं. व कलम | : | ५१/२०१९ भादंविसक २७९,३०४-अ मोटार वाहन अधिनियम १३४,१३४ ब,१७७,१८४,३/१८१ |
| गु.घ.ता.वेळ .ठिकाण | : | ०२/०२/२०१९ रोजी ०५.०० वा प्रिंयका चौक ते रूपाभवानी चौकाकडे सोलापूर |
| गु. दा. ता.वेळ | : | ०९/०२/२०१९ रोजी १२.१७ वा |
| फिर्यादी | : | बाळु कोळप्पा चौगुले वय-२६ वर्ष धंदा-चालक रा. २/८१,मड्डी वस्ती भवानी पेठ, सोलापूर |
| आरोपीचे नांव | : | १. मोटार सायकल मालक अजय मनोहर कांबळे रा.गुजर वस्ती,रविवार पेठ सोलापूर<br>२. विशाल देवीदास बनसोडे वय-१७ वर्ष रा.मुकुंद नगर, भवानी पेठ सोलापूर |
| हकिकत | : | यात हकीकत अशी की, बाजुस नमुद तारखेस, वेळी व ठिकाणी, यात दि.०२/०२/२०१९ रोजी सायंकाळी ०५.०० वा चे सुमारास माझी आई श्रीमती लक्ष्मीबाई कोळप्पा चौगुले वय-६० वर्ष रा.मड्डी वस्ती भवानी पेठ सोलापूर ही भाजी आणणेसाठी घरातुन निघुन प्रिंयका चौक ते रूपाभवानी चौकाकडे जाणारा रस्ता ओलांडत असताना प्रिंयका चौकाकडुन रूपाभवानी चौकाकडे जाणारे अल्पवयीन मुलगा विशाल देविदास बनसोडे वय-१७ वर्ष रा.मुकुंद नगर भवानी पेठ सोलापूर हा त्याचे ताब्यातील मोटार सायकल हिरो एच.एफ.डिलक्स.नं.एमएच-१३-बीएस.८४६५ ही विनापरवाना,हयगयीने,निष्काळजीपणाने ,अतिवेगाने चालवुन माझ्या आईस जबर धडक देवुन त्यात तिचे डोकीत पाठीमागील डावे बाजुस जबर मार लागुन जखमी होवुन तिचेवर मार्कंडेय सहकारी रूग्णालय येथे उपचार करून तसेच पुढील उपचाराकरीता सिव्हील हॉस्पीटल येथे दाखल केले असता तेथे उपचार चालु असताना ती बेशुध्द अवस्थेतच आज दि.०९/०२/२०१९ रोजी सकाळी ०६.५५ वा मयत झाली.म्हणुन.**तपास:-पोहेकॉ/७०२ गायकवाड** |